पंजीबध्द डाकेने, पोचपावतीसह
करारनामा क्रमांक बी-1 / 175 / 2017-18
दिनांक:- 16 / 03 /2018

क्रमांक / बांवि / निविदा/ 926 /2018
कार्यालय कार्यकारी अभियंता (बांध.)
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक:- 16 / 03 / 2018

प्रति,

**मे/ श्री.रहिम कन्ट्रक्शन कंपनी**
**मु.पो.ता.जि.गडचिरोली**

विषय :- **हालेकन्हार पळसगाव दर्गापुर रस्त्याची सुधारणा करणे ग्रामा 215 किमी 1/00 ते 4/00 ता.धानोरा**

वरिल कामाकरिता आपण सादर केलेली निविदा सक्षम अधिका-याकडून मंजूर करण्यात आलेली आहे. आपण सदर कामाकरिता ( 2 टक्के) सुरक्षा रक्कम म्हणून **भारतीय स्टेट बँक यांचे टि.डिआर.क्रं.37588305975 रक्कम रु.100000/- दिनांक** 13/03/2018 तसेच नुसार भरणा केलेला आहे. याद्वारे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येत असून खालील नमूद केल्याप्रमाणे सुचना लक्षात घेवून काम करावे.

| | | |
|---|---|---|
| 1) | कंत्राटाची किमत | :- रु.4345737.00 |
| 2) | मंजूर करण्यात आलेले दर | :- +12.00% **जास्त दर (GSTच्या बोज्यासहित)** |
| 3) | करारनाम्याची किंमत | :- रु.4867225.00 |
| 4) | काम पुर्ण करण्याचा कालावधी | :- 09 महिने |
| 5) | कालावधी संपणारा दिनांक | :- 16/03/2018 ते 15/12/2018 |
| 6) | लेखाशिर्ष | :- 5054 **मार्ग व पुल जिल्हा व इतर मार्ग सन** 2016-17 (50540402) |
| 7) | दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) | :- 06 महिने |
| 8) | निविदा सुचना क्र./टेंडर ऑयडी | :- **बी-1/13/2017-18/2018_GADCH_268798_84** |

सदर मंजूर केलेले काम आपण हे आदेश मिळताच त्वरित सुरु करावे . नमूद केलेल्या मुदतीत काम न झाल्यास करारनाम्याच्या कलम-2 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. पार पाडलेल्या कामाचे भुगतान अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यात येईल. कामाच्या ठिकाणी दोष निवारण कालावधीतील दुरुस्ती संबंधी फलक काम सुरु होण्याआधी लावण्यात यावे.

सर्व प्रकारचे विद्युत साहीत्य सुपरिचित बँन्डचे व आय.एस.आय.प्रमाणीत असावे व वेळोवेळी कार्यकारी अभियंता (बांध) यांचेकडुन प्रमाणीत करुन घेतलेले असावे.प्रमाणीत करुन न घेता साहीत्य वापरल्यास ते नाकारण्यात येईल व नाकारलेले साहीत्य बदलवुन प्रमाणीत साहीत्य वापरल्याशिवाय देयकाचे भुगदान केले जाणार नाही.

कंत्राटदाराने निविदा करारातील / निविदा सुचनातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास तसेच कामाचा गुणात्मक दर्जा न राखल्यास , कामामध्ये गैरप्रकार केल्यास महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमाक / झेडपीए/ 2006 / प्र.क्रं. 376 / वित्त-9 दिनांक - 29 जानेवारी 2007 अन्वये करारनामा रद्य करणे व सुरक्षा रक्कम ठेव जप्त करणे , काळया यादीत नाव टाकणे अथवा दंडात्मक कार्यवाहीस पात्र असाल व करारनाम्याच्या कलम -3 (क) अन्वये काम इतर कंत्राटदाराकडून अथवा खात्यामार्फत केल्या जाईल , व त्यावरिल लागणारा संपूर्ण खर्च आपणाकडून कायदेशिररित्या वसूल केल्या जाईल. याची नोंद घ्यावी.

शासन निर्णय क्रं. / विमास/1098/ प्र.क्रं.-98 शासन हमी दिनांक - 19.8.98 अन्वये कंत्राटी कामाचा विमा उतरविणे बंधन कारक राहील.

GST चा बोजा कंत्राटदारास स्वत: सहन करावयाचा आहे. GST बाबत कोणतेही दावा( Claim) स्विकारले जाणार नाही.

निविदेतील अट क्र.17 नुसार,कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी ठरविलेल्या ठिकाणी (विभागीय कार्यालय /उपविभागीय कार्यालय ) कार्यारंभ आदेश दिल्याचे 15 दिवसाचे आत साहित्य पुरवठा करणे अनिवार्य आहे.

पार पाडलेल्या कामाचे भुगतान अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यांत येईल. निधी खर्च करण्याच्या कालावधीची मर्यादा संपल्यानंतर काम विलंबाने पुर्ण झाल्यास देय रक्कमेचे भुगतान करण्याची जबाबदारी विभागाची राहणार नाही.

तसेच सदर काम इतर कंत्राटदारमार्फत न करता स्वत: करण्याच्या अटीवर कार्यारंभ आदेश देण्यात येत आहे . कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासुन विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास खालील प्रमाणे प्रतिदिवस दंडाची आकारणी करण्यात येईल.

**1) 1 ते 45 दिवसासाठी**

**अ) विहित मुदतीचे आंत मुदतवाढ प्रस्ताव प्राप्त झाल्यास** :- निरंक

**ब) विहित मुदतीत मुदतवाढ प्रस्ताव प्राप्त न झाल्यास** :- 100/-

2) 46 ते 90 दिवस :- 100/-

3) 91 ते 120 दिवस :- 200/-

4) 121 ते काम पूर्ण होईपर्यत :- 400/-

**तसेच कामाच्या मुदतीच्या 50% मुदतीनंतरही काम सुरु न झाल्यास काम रद्द करण्यात येईल.**

कार्यकारी अधिकारी (बांधकाम)
जिल्हा परिषद गडचिरोली

प्रतिलीपी :-

1) मा.अपर मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यकारी, जि.प. गडचिरोली याना माहितीस सविनय सादर.
2) उप विभागीय अभियंता,जि. प. (बांधकाम) उप विभाग **धानोरा** यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित.
3) **श्री.बी.एन.हिरे शाखा अभियंता पीओ-1** बांधकाम विभाग, जि. प. गडचिरोली याना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित .
4) **अंकेक्षण,धानोरा** बांधकाम विभाग, जि.प. गडचिरोली यांना कार्यवाहीस अग्रेषित, प्रथम चल देयकातून 1% कामगार उपकर वसूल करण्यांत यावा.
5) उप विमा संचालक म.रा. मुंबई विमा संचालनालय म.रा. गृहनिर्माण भवन (म्हाडा) 264 पहिला मजला कलानगरी बांद्रे (पूर्व) मुंबई 400 051.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम )
जिल्हा परिषद, गडचिरोली.